महाराष्ट्र
Maharashtra

# राज्यातील महापालिका, नगरपालिकांमधील बहुसदस्यीय पद्धतीबाबत संभ्रमावस्था.. तज्ज्ञांची मतेही परस्परविरोधी

Published on: Sep 27, 2021, 10:52 PM IST




आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मुंबई महापालिका वगळता वगळता अन्य महापालिका, नगरपालिका आणि नगर परिषदांमध्ये बहुसदस्यीय सदस्य पद्धतीचा ठराव मंत्रिमंडळाने मंजूर करून घेतला. विरोधकांनी देखील यावरून रान उठवला असताना तज्ज्ञांकडून ही आता संमिश्र प्रतिक्रिया मांडल्या जात आहे. ईटीव्ही भारतचा याबाबत रिपोर्ट..

**मुंबई -** आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी सरकारने मुंबई वगळता इतर सर्व महापालिका, नगरपालिका आणि नगर परिषदेच्या प्रभाग रचनेत बदल केला. या रचनेवरुन महाविकास आघाडी सरकारमधील मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. दुसरीकडे विरोधकांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. तर लहान-लहान प्रश्नांसाठी नागरिकांसमोर उद्भवणाऱ्या अडचणींपासून ते प्रशासकीयदृष्ट्या योजनांची अंमलबजावणी करताना उभ्या राहणाऱ्या समस्यांपर्यंत नक्की कोणत्या नगरसेवकाकडे दाद मागायची, असा प्रश्न निर्माण होणार आहे. सक्षम लोकशाहीसाठी ही पद्धत अतिशय चुकीची आहे, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तर समाजोपयोगी कामांचा दर्जा सुधारेल, नागरिकांना ते फायदेशीर ठरेल, अशा संमिश्र प्रतक्रिया उमटू लागल्या आहेत.

**बहुसदस्यीय पद्धत रद्द करा -**

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळाने महानगरपालिका आणि नगर परिषदांमध्ये फडणवीस सरकारने जी बहुसदस्यीय पद्धत आणली होती. त्या निर्णयाची पुन्हा अंमलबजावणी केली जात आहे. मुळात एक सदस्य पद्धत अंगीकारून त्याच पद्धतीने पुढे जायला हवे. बहुसदस्यीय पद्धतीमुळे महापालिका, नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकांमध्ये शहरांमधील नागरिकांच्या लोकशाहीच हणण होईल. लोकांचे प्रश्न मार्गी लागणार नाहीत. लोकप्रतिनिधी ही जबाबदारी झटकून एकमेकांकडे बोट दाखवतील. आपापसातील मतभेद आणि समन्वयाअभावी लोकांच्या प्रश्नांचे भांडवल करतील. राजकीय पक्षांचे प्राबल्य असलेल्या भागात स्थानिकांकडून लोकप्रतिनिधीवर प्रभाव पाडला जाणार नाही. छोट्या छोट्या संघटना, विकास समित्या क्षमता आणि आर्थिक कुवतीमुळे निवडणुकीच्या राजकारणात आपले प्रतिनिधी देऊ शकणार नाहीत. अशा स्वरूपाचे कुंपण घालण्याचे नियोजनबद्ध काम सरकारने केल्याचे सेंटर फॉर प्रमोटिंग डेमोक्रसीचे समन्वयक सीताराम शेलार यांनी सांगितले. तसेच जनमानसातपर्यंत लोकशाही पोहचवायची असल्यास बहुसदस्यीय पद्धत रद्द करायला हवी. कारण केंद्रीकृत शासनाकडे जाण्याचा हा प्रयत्न करत असून ही पद्धत लोकशाहीला मारक ठरणारी आहे. त्यामुळे राज्य शासनाने हा निर्णय बदलावा, अन्यथा कायदेशीररित्या लढा देऊ, असेही शेलार म्हणाले.

**कामांचा दर्जा चांगला राखला जाईल -**

बहुसदस्यीय पध्दतीमुळे शहरात कोणताही परिणाम होणार नाही. नवीन पद्धतीची लोकशाही देशात शिक्षीत पध्दत सुरु होत आहे. जातीय, धर्मीय मतदान न करता लोकांनी काम करणाऱ्या व्यक्ती निवडून दिल्यास मोठा फरक पडेल. लोकांमध्ये यासाठी जनजागृती करायला हवी. राजकीय लोकप्रतिनिधींनी यात विशेष लक्ष घालावे. आज देशात जाती परंपरा आहेत, त्यात वेळोवेळी सुधारणा करायला हव्यात. राज्य शासनाच्या बहुउद्देशीय पद्धतीमुळे दोन बाजू स्पष्ट जाणवतात. प्रश्न कोणाकडे मांडायचे असा लोकांमध्ये होणारा संभ्रम, तर दोन पेक्षा अधिक उमेदवार असल्याने कामांचा दर्जा चांगला राखण्यावर भर दिला जाईल. सामाजिक संस्थांनी यासाठी पुढाकार घ्यायला हवा. आताच्या काळात ही काळाची गरज आहे, असे प्रजा फांऊडेशनचे मिलिंद म्हस्के यांनी सांगितले.

**लोकांमध्ये संभ्रम दूर करणार -**

पूर्वी चार सदस्य पध्दतीची प्रभाग रचना होती. आता एका प्रभागात तीन उमेदवार दिले जाणार आहेत. मंत्रिमंडळाने यासंदर्भातील ठराव केला आहे. बहुसदस्यीय सदस्य पद्धतीमुळे मतदारांना तिघांनाही मतदान करण्याचा हक्क बजावावा लागेल. लोकांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही, याबाबत जनजागृती करणार असल्याचे महाराष्ट्र राज्य निवडणूक विभागाचे प्र. अवर सचिव अतुल जाधव यांनी सांगितले. तसेच मुंबईचा कायदा वेगळा असल्याने त्यात बदल केला नसल्याचे ते म्हणाले.

Link:- https://www.etvbharat.com/marathi/maharashtra/city/mumbai/confusion-about-multi-member-system-in-municipal-corporations-and-municipalities-in-the-state-know-experts-opinions/mh20210927225209104